दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS LAT SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक २८३ वा शुक्रवार दि.१९ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# खा. सुधाकर श्रृंगारे यांचा उमेदवारी अर्ज दाखल भाजपा महायुतीच्या अभूतपूर्व रॅलीने वेधले लातुरकरांचे लक्ष मतदारसंघातील हजारो नागरिकांची उपस्थिती









लातूर/प्रतिनिधी : लातूर लोकसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी गुरुवारी शहरात काढण्यात आलेल्या अभूतपूर्व रॅलीने लातुरकरांचे लक्ष वेधले. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रृंगारे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. गुरुवारी सकाळी ९ वाजता गंजगोलाईतील जगदंबा देवीचे दर्शन व आशीर्वाद घेवून महारॅलीचा शुभारंभ झाला. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे, राज्याचे मंत्री संजय बनसोडे, लोकसभा संयोजक तथा माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे, आ. बाबासाहेब पाटील, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेशअप्पा कराड, लोकसभा प्रभारी तथा प्रदेश सचिव किरण पाटील, माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर, माजी आ. गोविंद केंद्रे, सुधाकर भालेराव, बब्रुवान खंदाडे, शिवाजीराव पाटील कव्हेकर, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शिवसेनेचे संपर्क प्रमुख अॅड. बळवंत जाधव, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, लातूर विधानसभा प्रमुख गुरुनाथ मगे, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, शैलेश गोजमगुंडे, प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, प्रेरणा होनराव, युवा मोर्चाचे अजित पाटील कव्हेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ माने, राष्ट्रवादीचे अॅड. व्यंकट बेद्रे, पंडित धुमाळ, प्रशांत पाटील, प्रविण पाटील चिखलीकर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, शहर जिल्हाध्यक्षा रागिनी यादव, शिवसेनेच्या कल्पना बावगे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, रिपाइंचे देविदास सोनकांबळे आदींसह मान्यवर नेते सहभागी झाले होते. फुलांनी सजविलेल्या वाहनातून प्रदेशाध्यक्ष बावनकुळे व मान्यवरांनी लातूरकर जनतेला अभिवादन केले. जगदंबा देवीची महाआरती करून दर्शन घेतल्यानंतर ही रॅली हनुमान चौक येथे पोहोचली. तेथे हनुमंतांचे दर्शन घेतल्यानंतर रॅली गांधीचौकाकडे मार्गस्थ झाली. विविध वाद्यांच्या गजरात व घोषणांच्या जयघोषात ही रॅली निघाली. रॅलीमध्ये सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांच्या उत्साही घोषणांनी परिसर दणाणुन गेला होता. बसस्थानक, गांधी चौक या मार्गे ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे पोहोचली. महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत रॅलीची सांगता झाली. या रॅलीत युवा मोर्चाचे गणेश गोमचाळे, शिरिष कुलकर्णी, दिग्वीजय काथवटे, प्रविण सावंत, बाबू खंदाडे, रामचंद्र तिरुके, रमेश सोनवणे, गंगासिंह कदम, रवि सुडे, रविशंकर केंद्रे, संगीत रंदाळे, शैलेश स्वामी, सिध्दार्थकुमार सूर्यवंशी, शामसुंदर मानधना, भागवत सोट, ज्योतीराम चिवडे, वर्षा कुलकर्णी आदींसह मतदारसंघातून आलेल्या महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह नागरिकांची मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ना. संजय बनसोडे, माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांनी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज सादर केला.

# नाचता येईना अंगण वाकडे



गांधीनगर : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुरुवारी गांधीनगर लोकसभा मतदारसंघात रोड शो केला. याच दरम्यान, एबीपी न्यूजशी बोलताना अमित शाह म्हणाले की, ज्या शहरात ते कधीकाळी भिंतींवर पोस्टर लावायचे, तेथील लोकांचे प्रेम पाहून आज बरे वाटते. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यावरही त्यांनी हल्लाबोल केला आहे. प्रियंका गांधी यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले, जेव्हा तुम्ही काहीही करू शकत नसाल, तेव्हा तुम्ही ईव्हीएमला दोष देता. तेलंगणा आणि हिमाचलमध्ये काँग्रेसने सरकार स्थापन केले तेव्हा ईव्हीएम ठीक होते. आता हरले तर नाचता येईना अंगण वाकडे. राहुल गांधी यांच्या आरोपांना उत्तर देताना अमित शाह यांनी जेव्हा काँग्रेसच त्यांना गांभीर्याने घेत नाही, मग तुम्ही त्यांना का घेत आहात? संपूर्ण देशात कोणतंही आव्हान नाही. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेच्या ४०० जागा पार करतील. पुन्हा एकदा पंतप्रधान होणार आहेत असे म्हटले. गांधीनगरमधून दुस-यांदा निवडणूक लढवणारे अमित शाह यांनी गांधीनगरमधूनच निवडणूक प्रचाराला सुरुवात केली. वास्तविक, ते प्रथम भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचे निवडणूक प्रतिनिधी बनले. २०१९ मध्ये गांधीनगरमधून विजयी झाल्यावर अमित शाह यांनी मागील सर्व मार्जिन मोडल्या होत्या. भाजपाने १० लाख मतांनी जिंकण्यांचे टार्गेट ठेवले आहे.अमित शाह देशाच्या इतर भागात प्रचारात व्यस्त असताना दुसरीकडे त्यांच्या पत्नी गांधीनगरमध्ये प्रचारात व्यस्त होत्या. अलीकडच्या काही दिवसांत शाह यांच्या पत्नी सोनल शाह यांनी गांधीनगर लोकसभा मतदारसंघात घरोघरी जाऊन प्रचार केला आणि लोकांकडे मतं मागितली. याशिवाय भाजपाच्या कामगिरीचीही माहिती देण्यात आली. यावेळी त्यांच्यासोबत पक्षाचे अनेक पदाधिकारीही उपस्थित होते.

# पाणी-बाणी आली उंबरठयावर, तीन धरणात ११ टीएमसी पाणी साठा; पाणी जपून वापरण्याचे आव्हान



जीवनदायीनी असलेल्या राधानगरी धरणातील पाणीसाठा गेल्यावर्षीच्या तुलनेत घटला असून वाढता उन्हाळा व बाष्पीभवन यामुळे पाणीटंचाईचे संकट उंबरठ्यावर आले आहे. राधानगरी तालुक्यातील तिन्ही धरणात मिळून ११ टीएमसी पाणी साठा असून शिल्लक असल्याने पाणीसाठा काटकसरीने वापरण्याचे आव्हान उभे ठाकले आहे.

राधानगरी तालुका कोल्हापूर जिल्ह्याचे पाण्याचे कोठार म्हणून ओळखला जातो. तालुक्यात काळम्मावाडी (२८) राधानगरी (८.३६) व तुळशी (साडेतीन) धरणात सुमारे ४० टीएमसी पाणीसाठा आहे. त्यामुळे या तिन्ही धरणातील पाणी साठ्यावरच जिल्ह्यातील पिकांचे व उद्योगधंद्यांचे अर्थकारण अवलंबून आहे. गेल्यावर्षी पावसाने लवकरच दडी मारल्याने पाण्याची किमान दोन आवर्तने वाढली त्याचबरोबर काळमावाडी धरणाच्या मुख्य भिंतीच्या दुरुस्तीसाठी पाणीसाठा कमी केला होता. परिणामी उपलब्ध पाणीसाठा जूनच्या मध्यापर्यंत पुरवण्यासाठी तारेवरील कसरत करावी लागणार आहे. यावर्षी उष्णतामान कमालीचे वाढले आहे. एप्रिलच्या सुरुवातीलाच पारा ४०ओ पर्यंत चढला आहे. त्यामुळे पाण्याच्या बाष्पीभवनातील वाढ झाली असून जमीन तापल्यामुळे पाण्याचा खप वाढला आहे. यावर्षी गतवर्षीपेक्षा सव्वा पट जास्त पाण्याचा खप झाला आहे. रब्बी पिकांसाठी ५.१० टीएमसी तर उन्हाळ्यासाठी ४.६६ पीएमसी पाणी साठा वापरला गेला आहे.

पाटबंधारे खात्याने साधारणपणे १७ दिवसासाठी पाण्याची एक आवर्तन ठरवले असून एका आवर्तनासाठी १.१० टीएमसी पाणी संपतो. दिनांक १८ एप्रिल पर्यंत तिन्ही धरणात असणारा पाणीसाठा टीएमसीमध्ये आहे. राधानगरी २.८०( ३.१२) काळम्मावाडी ६.५८ (५.७५) तुळशी १.७०(१.५६)काळम्मावाडीतून गैबी बोगद्याद्वारेपंचगंगा व भोगावतीच्या वाट्याचे सहा टीएमसी पाणी सोडले जाते. त्यापैकी जवळपास एक टीएमसी पाणी अद्याप शिल्लक आहे .राधानगरी धरणामध्ये गेल्या वर्षी पेक्षा जवळपास अर्धा टीएमसी पाणी कमी आहे.

# लातूरच्या सर्वांगीण विकासासाठी काँग्रेसला भक्कम पाठिंबा द्या

## डॉ. काळगे यांच्या विजयासाठी रखरखत्या उन्हात आमदार धिरज देशमुख यांच्या भेटीगाठी अन् बैठका

लातूर : काँग्रेस पक्षाचा भर सकारात्मक, विकासात्मक राजकारणावर आहे. त्यामुळेच आज आपण लातूरचा विकास अनुभवत आहोत. लातूरचा हा विकास, विचार आणि नेतृत्व पुढे नेण्यासाठी लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या पाठीमागे सर्वांनी भक्कमपणे उभे रहावे. आपले उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहन 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी गुरुवारी (ता. १८) येथे केले. लातूर तालुक्यातील सामनगाव येथे श्री. गुरुलिंग बुलबुले, चिखुर्डा येथे श्री. रविंद्र काळे आणि साखरा येथे श्री. महादेव गोडसे पाटील, अंकोली येथे श्री. महादेव मुळे आणि चिंचोलीराव वाडी येथे श्री. गुरुनाथ गवळी यांच्या निवासस्थानी स्नेहभेट व संवाद बैठका घेवून आमदार धिरज देशमुख यांनी काँग्रेससह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधला. उन्हाचा कडाका दिवसेंदिवस वाढत आहे. उष्णतेची लाट सर्वत्र पसरली आहे. या रखरखत्या उन्हाचा सामना करीत डॉ. काळगे यांच्या विजयासाठी आमदार धिरज देशमुख यांच्या स्नेहभेटी अन् बैठकांचे सत्र नियमित सुरू आहे. आमदार धिरज देशमुख म्हणाले, लातूरच्या विकासात शिवराज पाटील चाकूरकर, शिवाजीराव पाटील निलंगेकर, विलासराव देशमुख, दिलीपराव देशमुख यांचे योगदान राहिले आहे. त्यांनी त्या काळात संघर्ष करून येथे विकासाची मुहूर्तमेढ रोवली. या सकारात्मक, विकासात्मक राजकारणाच्या मागे आपण खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. लातूर व मराठवाड्याला नेहमी लहरी हवामानाचा फटका बसतो आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांसाठी आपत्कालीन धोरण ठरवून वेळेत मदत करणे आवश्यक असते. भाजप सरकारच्या धोरणांमुळे आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना पीकविमा भरपाई मिळत नाही. शासनाची मदत, अनुदानही वेळेत मिळत नाही, याबाबत आमदार धिरज देशमुख यांनी नाराजी व्यक्त केली. घरातल्या दैनंदिन गरजा, शेती औजारे, खते, बी-बियाणे तसेच बिस्कीटांपासून वह्या, पुस्तके, पेन्सिलवर भाजप सरकार भरमसाठ जीएसटी आकारत आहे. शेतकऱ्यांना हक्काचा हमीभाव, शिक्षितांना हक्काचा रोजगार देण्याऐवजी मोफत धान्य, २ हजारांचा निधी दिला जातो. सरकारकडून होणारी ही फसवणूक आहे. महागाईचा वाढता दर, बेरोजगारांची वाढती संख्या, महिलांची असुरक्षितता, शेतीचे बिघडलेले अर्थकारण यावर एकच पर्याय आहे, तो म्हणजे देशात काँग्रेस, इंडिया आघाडी सरकार सत्तेत आणणे, असे आमदार धिरज देशमुख यांनी सांगितले. यावेळी अनुप शेळके, रविंद्र काळे, सुभाष घोडके, गोविंद बोराडे, भैरवनाथ सव्वासे, अनंत बारबोले, गुरुनाथ गवळी, श्रीनिवास शेळके, सचिन सूर्यवंशी, नरसिंग बुलबुले, शिवराज बुलबुले, लिंबराज मुळे यांच्यासह काँग्रेस व महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भाजपला 'हा' प्रश्न विचारा

महाराष्ट्रातील अनेक उद्योगधंदे गुजरातला पाठवले. आता येथील युवकांनी गुजरातला जावून नोकरीसाठी अर्ज करायचा का? लातूरमध्ये मराठवाडा रेल्वे बोगी कारखाना आणला. पण, येथे लातूर, मराठवाड्यातील किती युवकांना रोजगार मिळाला? याबाबत नागरिकांनी दक्ष राहून भाजपाला प्रश्न विचारले पाहिजेत. लोकांचे प्रश्न, लोकहिताचे काम यावर भाजप सरकार बोलत नाही. त्यामुळे लोकांच्या प्रश्नांवर बोलणारा, लोकांच्या हक्कासाठी लढणारा आपल्या हक्काचा प्रतिनिधी डॉ. काळगे यांच्या रूपाने आपल्याला केंद्रात पाठवायचा आहे. त्यासाठी जागरूक राहून मतदान करा. काँग्रेस, महाविकास आघाडीला मत म्हणजे विकासाला मत असणार आहे, असे आमदार धिरज देशमुख यांनी सांगितले.



## संपादकीय....

### निवडणूक अर्थशास्त्रातील आव्हान

पिनाकी चक्रवर्ती, विश्लेषक देशात विविध निवडणुकांवर सरकारी खर्चात दरवर्षी १९.९८ टक्के दराने वाढ झाली आहे. निवडणुकीतील स्पर्धात्मक स्वरूप हे सरकारच्या आर्थिक स्थितीवर दीर्घकालीन परिणाम करणारे असते. निकालानंतर बहुमत मिळवणारा पक्ष सरकार स्थापन करते आणि नव्या सरकारकडून राबविण्यात येणार्या धोरणाचा सरकारी खर्चावर व्यापक परिणाम होतो.अठराव्या लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आणि येत्या काही दिवसांतच पहिल्या टप्प्यांतील मतदान पार पडणार आहे. राजकीय पक्षांबरोबरच निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या उमेदवारांनी प्रचारासाठी कंबर कसली आहे. निवडणुकीचा धुराळा उडतो, तेव्हा तेव्हा निवडणुकीच्या सरकारी खर्चाबाबत चिंता व्यक्त केली जाते. निवडणुकीतील वाढत्या खर्चाचा हिशोब मांडताना आता 'एक देश एक निवडणूक' या बाजूनेही विचार होत आहे. खर्चाचा विचार करताना जागतिक स्तरावर निवडणुका घेताना थेटपणे येणारा सरकारी खर्च हा वेगवेगळा राहू शकतो. विविध देशांत आणि आपल्याकडे हा खर्च वेगळा असू शकतो. सोप्या शब्दांत सांगायचे झाल्यास, आपल्या देशात विविध निवडणुकांवर सरकारी खर्चात दरवर्षी १९.९८ टक्के दराने वाढ झाली आहे.निवडणूक खर्चात ढोबळपणे सहा प्रमुख गोष्टींचा समावेश असतो. निवडणूक अधिकार्यांवर होणारा खर्च, मतदार यादी तयार करणे, छपाईचा खर्च, लोकसभा आणि राज्य/केंद्रशासित प्रदेशांतील विधानसभा, विधान परिषदच्या निवडणुकीचे नियोजन करण्यासाठी होणारा खर्च, पंचायत समिती, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पालिका निवडणुकीवर होणार्या खर्चांसह निवडणुकीसंबंधीचे अन्य खर्च. यात सुरक्षा दलांच्या जवानांच्या वाहतूक खर्चाचाही उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. यावरून सरकारी खर्चाचे आकलन होते. प्रामुख्याने केंद्र सरकारचा सर्वाधिक खर्च हा प्रशासकीय व्यवस्थेवर होतो.भारत सरकारचे एकूण निवडणूक खर्चाचे बजेट सुमारे ४५ लाख कोटी रुपये आहे. सध्याचा निवडणूक खर्च पाहिल्यास ही रक्कम खूपच कमी आहे. त्यामुळे निवडणुकीवरचा वाढता सरकारी खर्च हा वास्तविक एखादा मुद्दा आहे का? यावर विचार करायला हवा. निवडणूक आयोगाने निवडणुकीची घोषणा करणे, ते नवीन सरकार स्थापन होईपर्यंत उमेदवारांच्या खर्चात अप्रत्यक्षपणे वाढच होत असते. उमेदवारांच्या या खर्चातील वाढीस अल्पकालावधीसाठी वाढलेला खर्च म्हणून गृहीत धरले जाते. या काळात ग्राहक बाजारावर निवडणूक खर्चाचा फायदा हा वेगवेगळा होतो. त्याचा आर्थिक प्रभाव हा विविध राजकीय पक्षांत असलेल्या चढाओढींसह अनेक कारणांवर अवलंबून असतो.अर्थात, निवडणुकीतील स्पर्धात्मक स्वरूप हे सरकारच्या आर्थिक स्थितीवर दीर्घकालीन परिणाम करणारे असते. निकालानंतर बहुमत मिळवणारा पक्ष सरकार स्थापन करते आणि नव्या सरकारकडून राबविण्यात येणार्या धोरणाचा सरकारी खर्चावर व्यापक परिणाम होतो. अशा रितीने खर्चातील होणार्या वाढीचा परिणाम हा सरकारचा आर्थिक ताळेबंद आणि मानव विकासावर दीर्घकाळासाठी होतो. केंद्र आणि राज्य सरकार हे एकाच प्रकारची सेवा किंवा सुविधा देण्याचे काम करत असतात. घटनेत केंद्र आणि राज्यांतील स्रोत आणि जबाबदारी निश्चित केली असून, त्या स्पष्ट आहेत. आर्थिक स्रोतांचे कायदेशीररित्या विभाजन पाहता आरोग्य, ग्रामीण विकास, कृषी यांसारखा बहुतांश पुनर्वितरण खर्च हा राज्यपातळीवर होतो. आदर्श रूपात विधानसभा ही अशा प्रकारच्या पुनर्वितरण मुद्द्यावर लढली जाते. कायदा आणि सुव्यवस्था प्रदान करण्याचा विषयही राज्यांचा असतो म्हणून विधानसभा कायदा आणि सुव्यवस्था तसेच सुशासनाच्या मुद्द्यावर लढायला हव्यात.

# राज ठाकरेंचा मोदींना बिनभांडवली बिनशर्त पाठिंबा म्हणजे?

महाराष्ट्राच्या मराठी माणसांसाठी राजकारण करणारा स्वयं घोषित हृदय सम्राट यांनी मराठी माणसाच्या महाराष्ट्राच्या भल्यासाठी मराठी अस्मितेच्या विरोधकांना चारीमुंड्या चित करून बिनशर्त पाठिंबा.हिंदू हृदय सम्राट बाळ ठाकरे यांची मराठी माणसांच्या न्याय हककसाठी लढणारी शिवसेना फोडणारेंना बिनशर्थ पाठिंबा.मुंबई मध्ये येऊन कष्टाची कामे करून पोटभरणारे पर प्रांतीय मराठी माणसाचा रोजगार हिसकाऊं घेतात म्हणून फेरीवाले टॅक्सी वाल्यांना कायदा हातात घेऊन दिवसा ढवल्या मारहाण करणारे मनसे सैनिक महाराष्ट्राचे उद्योग धंदे गुजराताला नेऊन मराठी तरुणांना बेरोजगार करणाऱ्यांना बिनशर्थ पाठिंबा देतात तेव्हा कुठेच खळल्याल खटाक करतांना मनसे सैनिक दिसले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आईचे चरित हरण केले तेव्हा आणि महाराष्ट्राच्या महापूरुषांचा अपमान करणारा भगत सिंग कोश्यारी,चंद्रकांत पाटील आणि अनेक उपट सुंबे यांना स्वरक्षण देणाऱ्यांना व यांच्या भूमीकेला बिनशर्थ पाठिंबा देणाऱ्या मराठी सुपारीबाज नेत्या विरोधात बुद्धिजीवी विचारवंत साहित्यिक संपादक पत्रकार आपली बुद्धी लेखनी झिजवतांना दिसत नाही.देशहिता पेक्षा मोठे काही नाही. असे सांगणारे देशद्रोही जेव्हा देशभक्त बनून इलेक्टोरल बाँन्ड सारख्या महाघोटाळ्याला करतात. तेव्हा त्यांना आपल्या कुचल्याने लेखणीने फोडून काढणारे मराठी माणसांचे



मराठी भाषेचे सुपरीबाज हृदय सम्राट बिनशर्थ पाठिंबा देतात तेव्हा मनाला खूप वेदना होतात.देशात हिंदुत्व हेच राष्ट्रीय सांगणरे जेव्हा महागाई,बेरोजगारी,भ्रष्टाचार या सारख्या प्रश्नांना डोळ्यासमोर ठेऊन देशभरात जन आंदोलने करून राज्यात केंद्रात सत्ताधारी झाले तेव्हा पासून त्यांना महागाई,बेरोजगारी,भ्रष्टाचार कुठेच दिसत नाही म्हणूनच मराठी माणसांचे मराठी भाषेचे सुपरीबाज हृदय सम्राट बिनशर्थ पाठिंबा देतात.त्याचे निर्भय बनो वाल्यांना काहीच वाटत नाही. इंडियात राहणाऱ्यांना भारत कधी समजला नाही.भारतात शेती असते त्या शेतीत शेतकरी शेतमजूर वर आकाशात पाहून रात्र दिवस शेतजमिनीत कबाड कष्ट करत असतो.तेव्हा त्याला त्याच्या शेततुन उत्पन्न देणाऱ्या कडधान्य,ज्वारी,उडीद,मुंग,तूर, सोयाबीन कापूस या माला ला हमी भाव हवा असतो. त्यासाठी जन आंदोलन करणार शेतकरी यांना आंदोलनजीवी वाटत होता. त्याला या मराठी माणसांच्या मराठी भाषेच्या सुपरीबाज हृदय सम्राटाने कधीच बिनशर्थ पाठिंबा दिला नाही. तो लोकसभा निवडणुकीत मोदींना बिनशर्थ पाठिंबा देतो.याला मराठी माणसांची तरुणांची. मराठा समाजाच्या मनसे सैनिकांची कशाचीच भीती कशी काय वाटत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो आणि पुतळा वापरुन स्वताची दुकानदारी चलविणारे मराठी माणसांचे मराठी भाषेचे सुपरीबाज हृदय सम्राट अरबी समुद्रात शिवस्मारकाची एकही वीट रचली नाही या बाबत एक शब्द तोंडूतून काढतांना दिसले नाही ते मोदीला बिनशर्थ पाठिंबा देतात यांचे एकाही मराठी मानसांना मराठी तरुण सैनिकांना वाईट वाटत नाही.याचे दुख होत आहे. मराठी माणसांचे मराठी भाषेचे सुपरीबाज हृदय सम्राट राज ठाकरे भलेही मोदींना बिनशर्त पठिंबा देतील पण महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजाच्या विचारांचा मावळा आज ही खेड्या पड्यात दर्या खोऱ्यात बारा बलुतेदार अलुतेदार म्हणून जगत आहे.तो मतदान करतांना विचार करीन असा विश्वास एक मराठी मतदार म्हणून मला वाटतो.दोन समाजात कायम तेढ निर्माण करून स्वतचे अस्तित्व टिकविणारा बिनभांडवली राज कारण करणारा नेता ओळख आणि सावध व्हा.शिक्षण,आरोग्य आणि रोजगारात होणारा खासगी मालकांचा भ्रष्टाचार यांना का कधीच दिसत नाही.त्या विरोधात त्यांच्या कानाखाली मारण्याची आरोळी का दिल्या जात नाही. कारण त्यांच्या भरोशावरच तर बिनभांडवली राज कारण चालते.हे तरुणांनी विसरू नये.राज ठाकरेंचा मोदींना बिनभांडवली बिनशर्त पाठिंबा म्हणजे काय यांचा मतदारांनी विशेष मराठी आणि मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या मतदारांनी गांभीर्याने विचार करून मतदान करावे.

************

सागर रामभाऊ तायडे
,९९२०४०३८५९,
भांडुप,मुंबई.

# उपाय कधी?

आठवड्यापूर्वी १३ व आता मंगळवारी २९ नक्षलवाद्यांना ठार करून सर्वाधिक प्रभाव असणा–या बस्तरमध्ये सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडले आहे. ठार झालेल्यांमध्ये शंकर राव व ललिता यांच्यासारख्या कट्टर मानल्या जाणा–या नक्षली नेत्यांचा समावेश आहे. या दोघांवर सरकारने लाखो रुपयांचे बक्षीसही जाहीर केले होते. मतदान तोंडावर असताना सुरक्षा दलांनी केलेल्या अचूक कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदनच करावे लागेल.कारण नक्षलवाद्यांचा लोकशाही प्रक्रियेवर व भारतीय संविधानावर विश्वास नाही. त्यांना बंदुकीच्या जोरावर व्यवस्था बदलायची आहे आणि म्हणूनच त्यांचा निवडणूक प्रक्रियेस विरोध आहे. काही दिवसांपूर्वीच छत्तीसगडमधील सभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता व येत्या तीन वर्षांत देशाला नक्षलवाद्यांपासून मुक्त करू अशी घोषणा केली होती. त्या अनुषंगाने सुरक्षा दलाच्या या मोठ्या कारवायांचा आनंद सरकारी पातळीवर साजरा होणे सध्याच्या परिस्थितीत अपेक्षितच! मात्र, दीर्घकाळापासूनच्या या वक्तव्यही याच समजातून आलेले दिसते. मात्र, ज्या विषमतेतून व असमतोलातून या समस्येचा जन्म झाला तो रोग मुळातून दूर करायचा तर त्यावर विकासाचेच रामबाण औषध हवे याचा विसर सरकारला व प्रशासनाला पडलेला दिसतो. त्याच्या परिणामी फक्त मारल्या जाणा–या नक्षल्यांचे चेहरे व नावे तेवढी बदलत गेली पण हिंसाचार थांबला नाही की, नक्षलवाद संपुष्टात आला नाही! नोटबंदीची घोषणा करताना पंतप्रधान मोदी यांनी नक्षल्यांना व अतिरेक्यांना होणा–या अर्थपुरवठ्यावर नोटबंदीने आळा घातला जाईल अशी पुस्ती जोडली होती.प्रत्यक्षात असा अर्थपुरवठा कमी होण्याऐवजी वाढल्याचेच दिसते. नक्षल्यांकडून अलीकडच्या काळात जो शस्त्रसाठा जप्त करण्यात आला त्यावरून हे सिद्धच होते. एक हजार मीटरपर्यंत मारा करू शकणा–या एलएमजी बंदुका, रॉकेट व ग्रेनेड लाँचर्स नक्षल्यांकडून जप्त करण्यात आले आहेत. ज्या भागात रेशन पुरवठा सुरळीत करण्यात सरकारला अद्याप यश आलेले नाही त्या भागात नक्षल्यांना एवढ्या अद्ययावत शस्त्रास्त्रांचा पुरवठा बैठक असल्याने वा आवडल्याने या संघटनेत सहभागी होणा–यांची संख्या नगण्यच आहे.हल्ली केवळ दहशत निर्माण करता येते, लूटमार करता येते या आकर्षणापोटी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा भरणा नक्षली संघटनांमध्ये झाल्याचेच प्रकर्षाने जाणवते आहे. असो! मुळात अशा हिंसक समस्येचे मूळ शोधून ते दुरुस्त केल्याशिवाय त्या समस्येचे समाधान प्राप्त होऊ शकत नाही. सरकारी पातळीवर नेमके यालाच बगल दिली जाते. त्यामुळे चकमकींमधून कितीही नक्षली मारले तरी त्यांची जागा घेणारे संपत नाहीत की नक्षलवादही संपत नाही! सरकार मात्र नक्षलवाद संपविण्याच्या गर्जना करत राहते. बंदुकीच्या बळावर लोकशाही व्यवस्था कुणीही उलथवून टाकू शकत नाही हे या चळवळीच्या प्रभावक्षेत्रात असणा–या जनतेला पटवून देण्याचे धोरण सरकारला प्राधान्याने राबवावे लागेल व त्याचा सर्वांत खात्रीशीर मार्ग म्हणजे या भागाचा विकास करून विषमता, असमतोल दूर करून जनतेचा विश्वास प्राप्त करणे हाच आहे. हे झाले तरच या चळवळीस स्थानिकांचे बळ मिळणे थांबेल.



समस्येचे समूळ उच्चाटन अद्यापही सरकारला करता आलेले नाही, हेच या चकमकींमधून स्पष्ट होते. सुमारे चाळीस वर्षांपासून ही समस्या देशाला सतत भेडसावते आहे व सरकार त्याचे समूळ उच्चाटन करण्यात अपयशीच ठरते आहे. चकमकींमध्ये नक्षल्यांना कंठस्नान घातल्यावर सरकार आपली पाठ थोपटून घेते व नक्षलवादाचा बीमोड करण्याच्या गर्जना करते. मात्र, नक्षलवाद्यांना यमसदनास पाठविल्याने नक्षलवादाचा समूळ नायनाट होत नाही हे कटू वास्तव आहे. मारले गेलेल्यांची जागा दुसरे भरून काढतात व ही प्रक्रिया सरकारला केवळ गोळीला गोळीने उत्तर देऊन थांबविता येऊ शकत नाही, हेच वास्तव आहे.समस्येचे समूळ निराकरण करायचे असेल तर समस्येच्या मुळाशी जाऊन मूळ दुखण्यावर उपचार करावे लागतील. हे सरकारला कळत नाही असेही नाही. नक्षलवादाच्या समस्येवर कायदा व सुव्यवस्था आणि विकास या दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी प्रभावी काम करणे गरजेचे आहे आणि सरकारने हे सूत्र स्वीकारलेले आहे. मात्र, त्याच्या अंमलबजावणीच्या वेळेस सरकारचा भर हा केवळ कायदा व सुव्यवस्थेवरच असतो. त्यामुळे मोठ्या संख्येने नक्षलींना ठार केले की नक्षलवाद मोडून काढण्यात यश आले, हाच समज सरकारी पातळीवर दृढ झाल्याचे पहायला मिळते. गृहमंत्र्यांचे ताजे एवढ्या विपुल प्रमाणात होतो हे सरकारी यंत्रणांचे अपयशच नाही काय? माओवादी दहशतीला कथित राजकीय तत्त्वज्ञानाचे बळ असल्याने त्याकडे पाहण्याची अनेकांची दृष्टी ही उगाच मवाळ होते, असेच निदर्शनास येते. 'अर्बन नक्षल' गट किंवा समूहाची ताकद वाढण्यामागे हा वैचारिक भोंगळपणा किंवा छुपा भारतविरोध आहे. ताकद वाढलेले हे 'अर्बन नक्षल' गटच नक्षली चळवळीला होणा–या मोठ्या अर्थपुरवठ्याचे प्रमुख आधारस्तंभ बनलेले आहेत . मैदानी नक्षलवादापेक्षा हा छुपा नक्षलवाद जास्त घातक ठरतो आहे. त्यामुळेच नक्षल्यांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रे सहज प्राप्त होत आहेत. चार–दोन छोट्या–मोठ्या चकमकींच्या यशावर स्वत:ची पाठ थोपटून घेऊन नक्षलवादाचे हे चिवट व विस्तारलेले जाळे समूळ नष्ट करता येणार नाहीच! त्यावर रामबाण उपाय हा आदिवासी भागाचा वेगाने विकास करून विषमता व असमतोल दूर करणे हा आहे. नक्षल्यांची रसद थांबवायची असेल तर त्यांची दहशत मोडून काढून भयमुक्त वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी सरकार व प्रशासनाला स्थानिकांचा विश्वास जिंकावा लागेल. त्यावर भर न देता केवळ नक्षल्यांना ठार करण्यावर भर देणे म्हणजे स्थानिकांचा असंतोष आणखी वाढवणेच आहे कारण ठार होणारे नक्षली हे स्थानिकांपैकीच असतात. सध्या तर वैचारिक छत्तीसगडमध्ये काँग्रेसचे सरकार होते तेव्हा नक्षलवाद फोफावला, असा आरोप मोदी–शहा जोडीने केला होता. आता राज्यात भाजपचे सरकार असतानाही मोठ्या प्रमाणावर चकमकी सुरूच आहेत. याचा अर्थ नक्षल्यांचे बळ व कारवाया वाढल्याच आहेत.मुळात अशा समस्येकडे राजकीयदृष्ट्या बघून त्याचे समाधान प्राप्त करता येणे शक्य नाही, हे सरकारमध्ये बसणा–या सर्वच राजकीय पक्षांनी समजून घ्यायला हवे. चकमकीत नक्षलींचा खात्मा हे सुरक्षा दलाचे नक्कीच यश आहे. मात्र, त्यातूनच या समस्येचे निराकरण होईल हाच समज बाळगणे पूर्णपणे चुकीचे आहे. नक्षलवादी चळवळीची वाढ होण्यामागे त्यांच्या वैचारिक शिदोरीपेक्षा स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही जागोजागी देशात दिसणारे दारिद्र्य, गरिबी, अज्ञान, विषमता व असमानता या बाबी जास्त पूरक ठरल्या आहेत हे वास्तव आहे. या वास्तवाकडे पाठ फिरवून या चळवळीचे समूळ उच्चाटन करण्याच्या गर्जना तद्दन राजकीय घोषणाच! त्या प्रत्यक्षात कधीच उतरणार नाहीत. अशा वल्गना करणारे तोंडावर पडण्याचीच शक्यता जास्त! सामाजिक न्यायाची कास धरून प्रामाणिक उपाययोजनांशिवाय ही समस्या संपणे अशक्य! असे उपाय कधी होणार? हा खरा प्रश्न!१

# दररोज वाचन हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल:ॲड.रोहित सोमवंशी

लातूर :– अहोरात्र ज्ञानाची कास धरणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जगात सिंबॉल ऑफ नॉलेज म्हणून ओखळले जातात,ही घटना लक्षात घेवून प्रत्येकाने दररोज किमान चार पाने चांगले दर्जेदार ग्रंथ वाचन करुन ज्ञानार्जनासोबतच जीवन समृध्द करावे,हीच बाबासाहेबांनी खरी आदरांजली ठरेल,असे मत लातूर जिल्हा वकील मंडळाचे कोषाध्यक्ष ऍड.रोहित सोमवंशी यांनी येथे व्यक्त केले.

लातूरच्या सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालय व विस्तारीत वाचनकक्ष अभ्यासिकेत, रविवार,दि.१४ एप्रिल २०२४ रोजी क्रांतिसूर्य जोतिराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यान प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी आत्माराम गिरी यांची उपस्थिती होती.

प्रारंभी म.जोतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी वाचक ॲड.रोहित सोमवंशी हे लातूर जिल्हा वकील मंडळाच्या कोषाध्यक्षपदी विजयी झाल्याबद्दल व दुसरे प्रमुख पाहुणे सतीष पांचाळ यांचा महात्मा फुले लिखित सार्वजनिक




सत्यधर्म हा ग्रंथ व गुलाबपुष्प देवून सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना ऍड.रोहित सोमवंशी म्हणाले की,बाबासाहेबांना वाचनाची प्रचंड आवड होती,त्यातून त्यांनी आत्मसात केलेल्या ज्ञानाच्या आधारे या देशातील सर्वच घटकांचे सर्वांगीण कल्याण साधणारे भारतीय संविधान देशाला बहाल केले. या या ज्ञानपिपासून महामानवांची जयंती नाचून नव्हे तर वाचून साजरी करावी,बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानामुळेच माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीला जिल्हा वकील मंडळाचे कोषाध्यक्षपद सर्वाधिक मतांनी मिळवता आले. न्यायालयीन क्षेत्रात बाबासाहेबांना अभिप्रेत कार्य करण्याचा आमचा प्रयत्न आहे.शिव–फुले–शाहू–आंबेडकर यांच्या विचारांचा मानवतावादी वारसा घेवून जाण्याची जिम्मेदारांनी सर्वानी उचलावी.अध्यक्षीय समारोपात गिरी यांनी जयंतीनिमित्त बाबासाहेबांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सचिव बी.जी.होळीकर यांनी केले.लिपीक संकेत होळीकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला ग्रंथपाल अंजुषा काटे,वाचक आत्माराम गिरी,बुध्दभूषण बनसोडे,महादेव राऊत आदी उपस्थित होते.

## प्रशिक्षणार्थी पायलटचे नियंत्रण सुटल्याने विमान कोसळले

सातारा : क–हाड येथील विमानतळावर विमान चालविण्याचे प्रशिक्षण देत असताना प्रशिक्षणार्थी पायलटचे नियंत्रण सुटल्यामुळे विमान काही फूट अंतरावरुन जमिनीवर कोसळले. त्यामध्ये पायलट जखमी झाला. गुरूवारी सकाळी दहा वाजण्याच्या 'सोलो ट्रेनिंग' सुरु असताना ही दुर्घटना घडली. क–हाडच्या विमानतळावर मुंबईच्या दमानिया एअरवेजच्या ए ॅ भि ब सि अ न स फ्लाईग क्लबने आठ



महिन्यांपूर्वी वैमानिक प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. याठिकाणी वीस प्रशिक्षणार्थींची पहिली बॅच प्रशिक्षण घेत आहे. सध्या 'सोलो ट्रेनिंग' (प्रशिक्षणार्थीने एकट्याने विमान चालविणे) सुरू आहे. गुरूवारी सकाळी एक प्रशिक्षणार्थी हे प्रशिक्षण घेत होता. धावपट्टीवरुन हे फोर सीटर विमान धावत असताना त्याची पॉवर वाढली आणि विमान हवेत उडाले. त्यानंतर काही क्षणातच ते धावपट्टीवर दक्षिण बाजुच्या संरक्षक भर्तीजवळ कोसळले. त्यानंतर प्रशिक्षणार्थीसह अधिकारी व सुरक्षारक्षकांनी त्याठिकाणी धाव घेत प्रशिक्षणार्थीला अपघातग्रस्त विमानातून बाहेर काढले.

## मधुमेही व्यक्तींनी अंडी खाल्ल्यास रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते का? जाणून घ्या, तज्ज्ञ काय सांगतात..

अंडी ही आरोग्यासाठी अत्यंत पोषक आहे. प्रोटिन्सचा चांगला स्त्रोत म्हणून आहारात अंड्यांचा समावेश केला जातो. अंड्यांपासून तुम्ही आवडेल ते विविध पदार्थ बनवू शकता. विशेषत: अंड्यामध्ये असलेला पिवळा भाग मधुमेह आणि हृदयाशी संबंधित आजार असलेले लोक खाणे टाळतात. मधुमेह असलेल्या लोकांसाठी अंडी फायदेशीर आहेत का, याविषयी मॅक्स हेल्थ केअरच्या एंडोक्रायनोलॉजी आणि डायबिटीजचे प्रमुख डॉ. अंबरीश मिथल यांनी द इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तात याविषयी सविस्तर माहिती सांगितली.मधुमेहाच्या लोकांवर प्रोटिनचा कसा परिणाम होतो?जेव्हा तुम्ही प्रोटिन्सबरोबर कर्बोदके खाता तेव्हा कर्बोदकाचे ग्लुकोजमध्ये रुपांतर व्हायला वेळ लागू शकतो, ज्यामुळे टाइप २ मधुमेह असलेल्या रुग्णांमध्ये जेवण केल्यानंतर रक्ताची पातळी कमी होते.एक ग्रॅम प्रोटीन तुम्हाला चार कॅलरीज देत असतात. कर्बोदकाप्रमाणेच प्रोटीनसुद्धा लवकर तृप्त करून कॅलरीज कमी करतात, ज्यामुळे रक्तातील साखर नियंत्रणात राहण्यास मदत होते.आहारात प्रोटीनची मात्रा कमी असेल तर स्नायू कमवकुवत होतात, त्यामुळे उतार वयात मधुमेहाच्या रुणांना त्रास होतो. कमकुवत स्नायू फॅटी लिव्हर होण्यास कारणीभूत ठरू शकतात, ज्यामुळे लिव्हर सिरोसिस आणि कर्करोगदेखील होऊ शकतो. अंड्यातील पोषक घटक जाणून घ्या एका मध्यम आकाराच्या अंड्या (जवळपास ५८ ग्रॅम) मध्ये ६६ कॅलरीज, सहा ग्रॅम प्रोटीन आणि ४.६ ग्रॅम फॅट्स असतात. २० टक्क्यांहून अधिक सॅच्युरेटेड फॅट्स असतात. अंड्यांमध्ये खूप कमी कर्बोदके असतात. याशिवाय त्यात जीवनसत्त्वे बी २, जीवनसत्त्वे बी १२ आणि फोलेट, बायोटिन, पॅन्टोथेनिक ॲसिड आणि कोलिनसारखे जीवनसत्त्वे बी असतात. त्यात फॉस्फरस, आयोडिन आणि सेलेनियमसह इतर आवश्यक खनिजे आणि जीवनसत्त्वे ए आणि थोड्या प्रमाणात जीवनसत्त्वे डीसुद्धा असतात. अंड्याच्या पांढऱ्या आणि पिवळ्या भागात वेगवेगळे पौष्टिक घटक असतात. अंड्यातील पिवळ्या भागापेक्षा अंड्याच्या पांढऱ्या भागामध्ये जास्त प्रोटीन असते. अंड्यातील पिवळ्या भागामध्ये भरपूर फॅट्स असतात, ज्यामुळे पांढऱ्या भागापेक्षा पिवळा भाग कमीत कमी तीन पट जास्त कॅलरी बनवतात, पण पिवळ्या भागामध्ये पांढऱ्या भागापेक्षा जास्त जीवनसत्त्वे आणि पोषक घटक असतात.अंड्यातून सर्वात जास्त मिळणारा घटक म्हणजे प्रोटीन. नाश्त्यामध्ये दोन मध्यम आकाराची अंडी खाल्ल्याने तुम्हाला १२ ग्रॅम प्रोटीन मिळू शकतात. त्यामुळे अंडी खाऊन दिवसाची सुरुवात करणे कधीही चांगले आहे.(इंडियन कौन्सिल फॉर मेडिकल रिसर्च) नुसार, प्रौढ व्यक्तींनी शरीराच्या वजनाच्या प्रति किलो ०.८ ते १ ग्रॅम प्रोटीन खावेत. भारतीय अनेकदा दिवसाला ०.६ ग्रॅमसुद्धा प्रोटीन विकत घेत नाही.मधुमेह असलेल्या लोकांनी दररोज प्रोटीनच्या माध्यमातून १५ ते २० टक्के कॅलरीचे सेवन करणे आवश्यक आहे. याचबरोबर नियमित व्यायाम करणारे आणि जे खेळाडू असतील त्यांनी जास्त प्रमाणात प्रोटिनचे सेवन करावे. अंड्यांमध्ये कर्बोदकांचे प्रमाण कमी असते. दोन मोठ्या अंड्यांमध्ये फक्त एक ग्रॅम कर्बोदके मिळतात.अंडी खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल वाढते?अंड आरोग्यासाठी चांगले आहे का नाही, हा वाद अंड्यातील पिवळ्या भागातील कोलेस्ट्रॉलमुळे निर्माण होतो. एका अंड्यामध्ये २०० मिलिग्रॅम पेक्षा जास्त कोलेस्ट्रॉल असतात, त्यामुळे रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी वाढू शकते आणि आपल्याला हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. एका संशोधनात असेही दिसून आले आहे की, आहारातील कोलेस्ट्रॉलच्या सेवनाने रक्तातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढत नाही. म्हणजेच अंडी खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल वाढत नाही. अभ्यासातून असे दिसून आले आहे की, दर आठवड्याला १२ अंडी खाल्ल्याने टाइप २ मधुमेह असलेल्या लोकांमध्ये कोलेस्ट्रॉल, ट्रायग्लिसराइड्स, ग्लुकोज किंवा इन्सुलिनच्या पातळीवर कोणताही चुकीचा परिणाम होत नाही. अंडी मधुमेह असलेल्या लोकांच्या आहारात एक पौष्टिक घटक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावतात. अंडी रक्तातील साखर किंवा हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्यावर परिणाम होऊ न देता शरीराला भरपूर प्रमाणात प्रोटिन्स आणि आवश्यक पोषक घटक पुरवतात आणि स्नायूंचे आरोग्य सुधारते

# एक नेरूळ एक जयंती मिरवणुकीला भिम सैनिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

नवी मुंबई / के. एच. हनवते :– नेरुळ एक जयंती एक यांच्या वतीने सालाबाद प्रमाणे या ही वर्षी महामानव प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती रामलिला मैदान येथे मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम आपले आदर्श तथागत भगवंत गौतम बुद्ध आणि बोधिसत्व महामानव प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार नेरूळ नवी मुंबई साह्यक पोलीस आयुक्त : राहुल गायकवाड साहेब यांच्या शुभ हस्ते दीपप्रज्वलन करून या भव्यदिव्य जयंती मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. या भव्य दिव्य जयंतीला हजारो भिम सैनिकांनी सहभाग घेऊन अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात आणि जल्लोषात जयंती साजरी केली. नेरुळ जयंती उत्सव समितीच्या माध्यमातून यावर्षी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत महिलांनी चौकाचौकात सादरीकरण केलेला लेझीम खेळाचे विशेष आकर्षण होते. अतिशय सुंदर पोशाख परिधान करून गेली महिनाभर केलेल्या सांघीक प्रशिक्षणाचे चीज झाले. त्याचप्रमाणे यावर्षी नव्यानेच सहभागी झालेल्या भिमरत्न युवा संघ नेरुळ यांनी दोन दिवसापूर्वीच सेक्टर १० नेरूळ येथील चौकात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीचे भव्यदिव्य बॅनर लाऊन फटाक्यांच्या अतीषबाजीने हार्दिक स्वागत केले व रामलीला मैदान येथील भव्य दिव्य मिरवणुकीत अतिशय शिस्तबद्ध व नियोजन, संपूर्ण मिरवणुकीत संघाच्या स्वयंसेवकांनी घेतलेल्या परिश्रमांच्या सहकार्यामुळे पोलिसांनी सुध्दा त्यांची विशेष प्रशंसा केली. सदर मिरवणूकच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत समितीचे सल्लागार महेश खरे, एल. आर. गायकवाड व समितीला सदैव सर्वांगीण सहकार्य करणारे समाजसेवक शरद सरवदे यांनी संपूर्ण मिरवणूकीत देधखरेख ठेवली व वेळोवेळी अपेक्षित सहकार्य केले. तसेच गेली दोन महिने समितीचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य यांनी स्वतःचा नोकरी–व्यवसाय व आरोग्य सांभाळून मिरवणूक संपूर्णपणे यशस्वी करण्यासाठी तन–मन–धनाने सहकार्य केले. महामानव यांची जयंती जल्लोषात साजरी करण्यासाठी नेरुळ मधील फक्त आपल्या बौद्ध समाजातील जेष्ठ, श्रेष्ठ व प्रतिष्ठित सर्व सन्माननीय हितचिंतक वर्गणीदारांनी भरभरून यथाशक्ती स्वेच्छेने अपेक्षित सर्वांगीण प्रतिसाद दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मिरवणूक यशस्वी करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या ज्यांनी अपेक्षापेक्षाही अमोल सहकार्य केले त्यांचे, समिती पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य, महिला लेझीम पथक, जेष्ठ सल्लागार, सक्रिय महिला व पुरुष कार्यकर्ते यांचे समितीच्या वतीने मनापासून आभार व धन्यवाद. समितीचे सल्लागार महेश खरे यांनी स्वतःच्या वतीने मिरवणूकच्या शेवटी सर्व उपस्थितांना स्नेहभोजन दिले. तसेच समाजसेवक : शरद (भाऊ) सरवदे यांच्यावतीने बेंजो वाद्यवृंद देऊन सहकार्य केले याबद्दल त्यांचेही विशेष आभार. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रामलीला मैदानात महानगरपालिकेच्या वतीने संपूर्णतः सुरूवातीला व जयंती कार्यक्रमाच्या शेवटी स्वच्छता मोहीम राबवली याबद्दल सामाजिक कार्यकर्ते रविंद्र सावंत व ॲड. गणेश रसाळ यांनी सहकार्य केले, त्याप्रमाणे महावितरण कंपनीने अपेक्षित लाईट पुरवठा योग्यरितीने चालू ठेवला, त्याचप्रमाणे नेरुळ पोलिस स्टेशन स्टाफ व ट्राफीक पोलिस यांनीही अपेक्षित सहकार्य केले. याबद्दल सर्वांचेच मनापासून धन्यवाद व आभार त्याचप्रमाणे गेली महिना–दोन महिने मिरवणूक तयारी करण्यासाठी समितीला मिटिंग घेण्यासाठी कपिलवस्तु बुद्धविहार, मुलगंधकुटी बुद्धविहार व विश्वरत्न बुध्दविहार याबद्दल सर्व संबंधित बुद्धविहार संस्थाप्रमुख यांचेही मनापासून धन्यवाद व आभार. संपूर्ण जयंती मिरवणुक यशस्वी करण्यासाठी सुरुवातीपासून शेवटपर्यंत समितीचे सर्वच पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अप्रतिम मेहनतीने सहकार्य केले याबद्दल त्या सर्वांचे विशेष आभार व धन्यवाद. सर्वांनी यापुढेही अपेक्षित सहकार्यात कायम सातत्याने पुढाकार घेऊन कार्य करावे अशी सदिच्छा. आपले विनीत : नेरुळ जयंती उत्सव समिती, नवी मुंबई.






# तुम्ही १४ दिवस मेथीचे दाणे खाल्ले तर तुमच्या शरीरावर काय परिणाम होईल? डॉक्टरांकडून जाणून घ्या

मेथी आरोग्यासाठी खूपच लाभदायक आहे. मेथी अत्यंत गुणकारी मानली जाते. परंतु, केवळ मेथीच नाही तर याचे बीसुद्धा खूप उपयोगी आहे. संपूर्ण भारतात मेथी दाण्यांचे सेवन केले जाते. मेथी शरीरासाठी खूपच फायदेशीर असते. यामध्ये अनेक पोषक तत्व आढळतात. मेथीचे दाणे आरोग्याच्या दृष्टीने फार गुणकारी आहेत. मेथी दाण्यामध्ये अनेक पोषक तत्व असतात. सोडियम, पोटॅशियम, फायबर, लोह, कॅल्शियम, व्हिटॅमिन डी आणि व्हिटॅमिन सी च्या पोषक तत्वाने मेथी दाण्याचे पाणी भरलेले आहे. पण, तुम्ही १४ दिवस मेथीचे दाणे खाल्ल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होतो? याच विषयावर जिंदाल नेचरक्योर इन्स्टिटयूटच्या मुख्य आहारतज्ज्ञ पी. एस. सुषमा यांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ.जर तुम्ही १४ दिवस मेथीचे दाणे खाल्ले तर तुमचे आरोग्य अनेक प्रकारे सुधारू शकते. मेथीचे दाणे शरीरातील रक्ताची कमतरता दूर करण्यासाठी फायद्याचे ठरतात. मेथीमध्ये विरघळणारे फायबरदेखील असते जे कार्बोहायड्रेट्स आणि साखरेचे शोषण कमी करून रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते. मधुमेह किंवा इन्सुलिन प्रतिरोधक असलेल्या लोकांसाठी हे खूप चांगले आहे. याव्यतिरिक्त मेथी आतड्यांमधील कोलेस्ट्रॉलचे शोषण रोखण्यास मदत करते, ज्यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते.मेथीच्या बियांचे सेवन कसे करावे? एक चमचा मेथी रात्रभर पाण्यात भिजत ठेवा.



दुसऱ्या दिवशी सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन करा. मेथीच्या अनेक आरोग्यदायी फायद्यांमुळे १४ दिवस ते खाल्ल्याने शरीरावर विविध प्रकारचे परिणाम होऊ शकतात. ते फायबर, प्रथिने, लोह आणि इतर महत्त्वपूर्ण घटकांनी समृद्ध आहेत. पचनास मदत करणे, रक्तातील साखर नियंत्रित करणे, वजन कमी करण्यास प्रोत्साहन देणे आणि कोलेस्ट्रॉल कमी करणे यासाठी त्यांची ख्याती आहे.मेथीच्या दाण्यांमध्ये जास्त प्रमाणात फायबर असते, जे बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून सुटका मिळवून देण्यास मदत करते. तसंच पोटात होणारी जळजळही यामुळे कमी होते. मेथीच्या दाण्यातील उच्च फायबर सामग्री आतड्यांच्या हालचालींचे नियमन करून आतड्याच्या आरोग्यास मदत करू शकते. शिवाय, मेथीचे दाणे रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यास मदत करू शकतात. ज्यांना आधीच मधुमेह आहे किंवा तो होण्याचा धोका आहे, अशा लोकांसाठी हे विशेषतः उपयुक्त ठरू शकते. तथापि हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, मेथीच्या दाण्यांवरील प्रतिक्रिया व्यक्तीपरत्वे भिन्न असू शकतात. काही लोकांना अतिसार किंवा लर्जीक प्रतिक्रियांसारखे नकारात्मक दुष्परिणाम होऊ शकतात; जर त्यांनी जास्त प्रमाणात बिया खाल्ल्या तर या दुष्परिणामांमध्ये अतिसार, मळमळ आणि क्वचित चक्कर येणे आणि डोकेदुखी होऊ शकते.

# लातूर लोकसभा मतदारसंघात गुरुवारी ११ नामनिर्देशनपत्रे दाखल











लातूर, दि. १८ : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ४१–लातूर लोकसभा मतदारसंघात गुरुवार, १८ एप्रिल २०२४ रोजी ११ नामनिर्देशनपत्रे दाखल झाली. तसेच १५ व्यक्तींनी ३० नामनिर्देशनपत्रे प्राप्त करून घेतली.
लातूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्याकडे १८ एप्रिल रोजी दाखल नामनिर्देशनपत्रे– नरसिंगराव निवृत्ती उदगीरकर (अपक्ष), मच्छिंद्र गुणाजी ऊर्फ गुणवंतराव कामंत (बहुजन भारत पार्टी), मच्छिंद्र गुणाजी ऊर्फ गुणवंतराव कामंत (अपक्ष), सुधाकर तुकाराम श्रंगारे (भारतीय जनता पार्टी), रवींद्र स्वामी (अपक्ष), काळगे शिवाजी बंडप्पा (इंडियन नॅशनल काँग्रेस), ॲड. प्रदीप एस. चिंचोलीकर (अपक्ष), लखन राजाराम कांबळे (राष्ट्रीय बहुजन पार्टी), डॉ. अनिल सदाशिव कांबळे (भारतीय जनता पार्टी), सुधाकर तुकाराम सूर्यवंशी (अपक्ष), पपीता रावसाहेब रणदिवे (अपक्ष).

# पंतप्रधान मोदींच्या विकसित भारताच्या गॅरंटीला साथ द्या भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन

## महायुतीच्या जनआशीर्वाद सभेला लोटला जनसागर





**राष्ट्रीय भावना हा लातूरच्या मातीचा गुण : बसवराज पाटील मुरुमकर** लातूर मतदारसंघातील नागरिकांनी सर्वधर्म समभाव जोपासलेला आहे. येथे जातीपातीला थारा नाही. राष्ट्रीय भावना हा लातूरच्या मातीचा गुण आहे. परंतु काही लोक वेगळ्या विचाराने अपप्रचार करीत आहेत. ते लोकशाही आणि लातुरकर नागरिकांसाठी घातक आहे. त्यामुळे नागरिकांनी राष्ट्रीय भावना जोपासत देश हितासाठी महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांना विजयी करावे, असे आवाहन माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर यांनी केले.

लातूर/प्रतिनिधी :– पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात मागील दहा वर्षात देशाची विकासाच्या महामार्गावर वेगवान घौडदौड सुरू आहे. आगामी काळात भारताला विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प मोदी यांनी केलेला असून आजवरची मोदी यांची कारकीर्द पाहता देशातील नागरिकांनाही मोदी यांची गॅरंटी आहे. याच गॅरंटीला लातूर मतदारसंघातील जनतेने साथ द्यावी, असे आवाहन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. भाजपा महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या जनआशीर्वाद सभेत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. मंचावर राज्याचे मंत्री संजय बनसोडे, लोकसभा संयोजक तथा माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे, आ. बाबासाहेब पाटील, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेशअप्पा कराड, लोकसभा प्रभारी तथा प्रदेश सचिव किरण पाटील, माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर, माजी आ. गोविंद केंद्रे, सुधाकर भालेराव, बब्रुवान खंदाडे, शिवाजीराव पाटील कव्हेकर, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शिवसेनेचे संपर्क प्रमुख ॲड. बळवंत जाधव, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, लातूर विधानसभा प्रमुख गुरुनाथ मगे, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, प्रेरणा होनराव, युवा मोर्चाचे अजित पाटील कव्हेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ माने, राष्ट्रवादीचे ॲड. व्यंकट बेद्रे, पंडित धुमाळ, प्रशांत पाटील, प्रविण पाटील चिखलीकर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, शहर जिल्हाध्यक्षा रागिनी यादव, शिवसेनेच्या कल्पना बावगे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, रिपाइंचे देविदास सोनकांबळे यांच्यासह महायुतीतील नेते व पदाधिकार्यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

**मी तुमचा योग्य वकील : बावनकुळे**
आ. संभाजी पाटील यांनी आपल्या भाषणात लातूरसाठी कायमस्वरुपी पाणी योजना व केंद्रीय विद्यापीठाची मागणी केली. हा धागा पकडत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, संभाजीराव मी तुमचा योग्य वकील आहे. केंद्र आणि राज्यातही आपले सरकार आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणून मला असणार्या अधिकारांचा वापर करत मी उद्याच प्रधानमंत्री मोदी यांना पत्र लिहीत या मागण्या पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करेन, अशी ग्वाही दिली. विशेष म्हणजे प्रधानमंत्री मोदी लवकरच लातूरला येणार आहेत. लातूरच्या विकासाची लक्ष्मी खा. श्रृंगारे यांच्या कमळावर बसून येणार असल्याचेही बावनकुळे यावेळी म्हणाले.

जनआशीर्वाद सभेला मार्गदर्शन करताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, एका निष्कलंक नेतृत्वाचा अर्ज भरण्यासाठी मी येथे आलो आहे. खा. श्रृंगारे बोलतात कमी पण काम जास्त करतात. त्यांनी लोकसभेत ५१३ प्रश्न उपस्थित केले तर ६८ चर्चांमध्ये सहभाग नोंदविला. श्रृंगारे यांच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात मतदारसंघातील ३ लाख ५ हजार ९७७ शेतकर्यांच्या खात्यात किसान सन्मान योजनेचा निधी वर्ग झाला. १६ लाख ५७ हजार ८७७ व्यक्तींना मोफत अन्नधान्य पुरविण्यात आले. सव्वा चार लाख नागरिकांना आयुष्मान भारत योजनेत समाविष्ट करण्यात आले. अशा कितीतरी योजना सांगता येतील. बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसने अनेक वर्षांपूर्वी गरीबी हटावचा नारा दिला होता. परंतु गरीबांना अधिक गरीब करण्याचे काम त्यांनी केले. काँग्रेसच्या काळात देशात ३६ मोठे घोटाळे झाले. मोदींच्या कार्यकाळात एकही घोटाळा झालेला नाही. आपले एक मत कमळाला दिले तर काय बदल होवू शकतो हे मोदी यांनी मागील दहा वर्षात दाखवून दिले आहे. एका मतामुळे देशातील नागरिकांना मोफत अन्नधान्याची गॅरंटी मिळाली. आयुष्मान भारत योजनेत मोफत उपचार करून घेण्याची सोय मिळाली. आज तरुणही भाजपालाच मतदान करीत आहेत. जगातील एकाही देशाला जमले नाही परंतु, मोदींच्या नेतृत्वात भारताचा तिरंगा आज चंद्रावरही फडकत असल्याचा अभिमान प्रत्येक देशवासियांना असल्याचे त्यांनी सांगितले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेले संविधान काश्मिरमध्येही लागू व्हावे, असे काँग्रेसला कधीच वाटले नाही. पण मोदी यांनी ३७० कलमाची किड हटवली. आज देशमुख पार्टी संविधान बदलत असल्याचा अपप्रचार करत आहे. पण संविधानाचा धर्मग्रंथ हातात घेवून संसदेच्या पायरीला नतमस्तक होत मोदी यांनी संसदेत प्रवेश केला आहे. याउलट काँग्रेसने संविधानकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दोन वेळा निवडणुकांमध्ये पराभूत करण्याचे पाप केले. काँग्रेसचे नेते खोटे बोलत आहेत. संविधान अधिक मजबूत करण्याचे काम मोदी यांच्याकडून केले जात आहे. भाजपाने आपल्या संकल्प पत्राची घोषणाही डॉ. आंबेडकर जयंतीच्या मुहूर्तावर केली आहे. ज्या काँग्रेसने प्रभू श्रीरामचंद्रांना काल्पनिक म्हटले होते त्या रामचंद्रांचा ५२७ वर्षांचा वनवास मोदी यांच्या नेतृत्वामुळे संपुष्टात आला. तंबूत असणारे रामचंद्र भव्य मंदीरात विराजमान झाल्याचे ते म्हणाले. या निवडणुकीत आपण जे मत देणार आहोत ते मत समान नागरी कायद्याला पाठिंबा दर्शविणारे असेल. नागरिकांना मोफत अन्न देणारे, तीन कोटी नागरिकांना घर देणारे हे मत असणार आहे. हीच मोदी यांची विकसित भारताची गॅरंटी असल्याचे बावनकुळे म्हणाले. यावेळी बोलताना मंत्री संजय बनसोडे म्हणाले की, देशाला विकासाच्या महामार्गावर पुढे नेण्यासाठीच अजितदादा पवार यांनी मोदी यांना पाठींबा दर्शविला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी संविधान व लोकशाही वाचविण्याचे काम करीत आहेत. विरोधक केवळ भूलथापा मारत असल्याचे सांगून डॉ. आंबेडकर यांना भारतरत्न देण्यास काँग्रेसला इतका कालावधी का लागला ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी इंदू मिलची जागा स्मारकासाठी मिळवून दिली. तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे राहात असल्याचे ते म्हणाले. सभेस संबोधित करताना आ. संभाजी पाटील म्हणाले की, २०१७ –१८ मध्ये जिल्ह्यातील जनतेने ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत सर्व सत्ता भाजपाकडे सोपवली. त्यानंतर आपण पक्ष नेतृत्वाकडे लातूरसाठी रेल्वे बोगी कोच कारखान्याची मागणी केली. वरिष्ठ नेत्यांनी ती मागणी तात्काळ मंजूर केली. दोन महिन्यांपूर्वी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते या कारखान्याचे लोकापर्णही झाले आहे. जिल्ह्यातील जनतेवर आपला विश्वास आहे. या निवडणुकीत लातूरची जागा मराठवाड्यात सर्वाधिक मताधिक्याने विजयी होणार असल्याची आपल्याला खात्री आहे. मात्र लातूरकरांच्या दोन मागण्या पूर्ण कराव्यात, असे सांगत ६० वर्षात लातूरचा पाणीप्रश्न सुटला नाही त्यामुळे लातूरकरांना हक्काचे पाणी द्या, तसेच शैक्षणिक राजधानी असणार्या लातुरसाठी केंद्रीय विद्यापीठ मंजूर करा अशी मागणी आ. निलंगेकर यांनी केली. खा. सुधाकर श्रृंगारे यावेळी म्हणाले की, मागील निवडणुकीत आपण मला लातूरचा खासदार म्हणून काम करण्याची संधी दिली. या काळात मतदारांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी काम केले आहे. आपण दिलेले मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जाणार आहे. आपला देश सुरक्षित हातात सोपवायचा असून त्यासाठी पुन्हा एकदा संधी द्या, असे आवाहनही त्यांनी केले. शिवसेना संपर्कप्रमुख बळवंत जाधव म्हणाले की, काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वाला सामान्य जनतेच्या प्रश्नांची जाण नाही. त्यामुळेच लातूरचे प्रश्न सुटले नाहीत. खा. सुधाकर श्रृंगारे यांच्या माध्यमातून आता शहरासह संपूर्ण मतदारसंघातील प्रश्नांची सोडवणूक होत असून ही कामे गतिमान करण्यासाठी श्रृंगारे यांना पुन्हा निवडून देणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. यावेळी आ. बाबासाहेब पाटील, माजी मंत्री बसवराज पाटील, रिपाइंचे देविदास सोनकांबळे यांच्यासह महायुतीतील पदाधिकारी व नेत्यांनी समयोचित मनोगत व्यक्त केले. या सभेचे सुत्रसंचलन शैलेश गोजमगुंडे तर आभार प्रदर्शन गुरुनाथ मगे यांनी केले. या सभेस ऋषिकेश कराड, युवा मोर्चाचे गणेश गोमचाळे, शिरिष कुलकर्णी, दिग्वीजय काथवटे, प्रविण सावंत, बाबू खंदाडे, रामचंद्र तिरुके, रमेश सोनवणे, गंगासिंह कदम, रवि सुडे, रविशंकर केंद्रे, संगीत रंदाळे, शैलेश स्वामी, सिध्दार्थकुमार सूर्यवंशी, शामसुंदर मानधना, भागवत सोट आदींसह मतदारसंघातून आलेल्या महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE